# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई

दरपत्रक सूचना क्रमांक १/क-१/२०२५

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या सुरक्षा विभागात पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयामार्फत बंदोबस्तासाठी येणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता पुरविण्यात येणारे **वरिष्ठ सुरक्षा अधिकारी (कोट/पॅन्ट), सुरक्षा अधिकारी (सफारी शर्ट/सफारी पॅन्ट), सुरक्षा सहायक (शर्ट/पॅन्ट) व सुरक्षा सहायक (महिला) (साडी/ब्लाऊज)** याप्रमाणे पदनिहाय गणवेष धुलाई व इस्त्री करण्यासाठी दरपत्रक मागविण्यात येत आहेत. याकरीता संबंधित धुलाई ठेकेदार (धोबी) यांनी आपले दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यामधून **मा.सचिव (१) (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई** या पत्यावर गुरुवार, दिनांक ६ फेब्रुवारी, २०२५ रोजी पूर्वी किंवा त्या दिवशी दुपारी ४.०० वाजेपर्यंत पाठवावे. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके त्याच दिवशी उघडण्यात येतील.

**अटी व शर्ती :-**

१) धुलाईचे दर हे सुचीनिहाय/तपशिलवार देण्यात यावे.

२) सुरक्षा विभागामार्फत धुलाई करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात येणारे गणवेष विहित वेळेत, सुस्थितीत व गहाळ न करता पुन्हा सुरक्षा विभागास परत करण्याची जबाबदारी संबंधित धुलाई ठेकेदाराची राहील.

३) धुलाईचे देयक सादर केल्यानंतर निधी उपलब्धतेप्रमाणे देयक अदा करण्यात येईल. देयक अदा करण्यास कोणत्याही अडचणीमुळे विलंब झाल्यास, व्याज देय राहणार नाही.

४) एक वा सर्व दरपत्रक कोणतेही कारण न दाखविता स्विकारण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार या सचिवालयाने राखून ठेवला आहे.

५) दरपत्रकात आपली कोणतीही अट मान्य केली जाणार नाही.

**सचिव (१) (कार्यभार)**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय